बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०९ | बुधवार, दि.७ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## निवडणूक आयोगाचा निर्णय:राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि चिन्ह अजितदादांचाच!

**नवी दिल्ली :** शिंदे–ठाकरे गटाच्या वादानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस मधिल फुटीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने निकाल दिला आहे. त्यानुसार अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असल्याचे आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिला आहे. या निर्णयामुळे शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. पक्षांतर्गत निवडणूक झाल्या नसल्याचे निरीक्षण नोंदवत शरद पवार गटाने उद्या (बुधवारपर्यंत) पक्षाचे नाव आणि चिन्ह सूचवावे असेही आयोगाने स्पष्ट केले आहे. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे शरद पवार गटाच्या नेत्यांनी सांगितले. जुलै महिन्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडून अजित पवार यांच्यासह ९ आमदारांनी राज्यातील महायुती सरकारमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. शिवसेना फुटीवर निर्णय देताना केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या बाजूने निर्णय देत पक्षनाव आणि पक्षचिन्ह हे शिंदे



गटाला देण्याचा निर्णय दिला होता. शिवसेना फुटीनंतर आज निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी फुटीवर निर्णय दिला आहे. अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट करत राष्ट्रवादीचे पक्षचिन्ह आणि पक्षनाव अजित पवार गटाला देण्याचा निकाल दिला आहे.

शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादीतही फूट पडल्याने हे प्रकरणही निवडणूक आयोगाकडे गेले होते. हे प्रकरण गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित होते. याप्रकरणी एकूण १० सुनावण्या घेण्यात आल्या. या प्रत्येक सुनावणीवेळी शरद पवार हे जातीने हजर होते. निवडणूक आयोगाला दोन्ही गटाकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली होती.

पक्षांतर्गत निवडणूक झाल्या नसल्याचे निरिक्षण नोंदवित अजित पवाराकंडील पक्ष हा खरा पक्ष आहे. पक्ष आणि चिन्ह अजित पवार गट वापरतील असे निर्देश आयोगाने दिले आहेत. यावेळी दोन खासदारांनी अजित पवार गटाच्या बाजूने तर ५ आमदारांनी दोन्ही बाजूंनी पत्र दिले असल्याचे स्पष्ट झाले आहे. अजित पवारांसोबत महाराष्ट्रातील ४१ आमदार, नागालँडमधील ७ आमदार, झारखंडमधील १ आमदार, लोकसभेचे २ खासदार, विधान परिषदेतील ५ आमदार तर राज्यसभेतील १ खासदार आहेत. तर शरद पवारांसोबत राज्यातील १५ आमदार, केरळमधील १ आमदार, लोकसभेतील ४ खासदार, राज्यसभेतील खासदार आणि विधान परिषदेतील ४ आमदार आहेत.

जो न्याय शिवसेनेच्या शिंदे गटाला तोच न्याय आता निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला दिला आहे. राष्ट्रवादीचे चिन्ह आणि पक्षाचा निकाल हा अजित पवार गटाच्या बाजूने लागला असून हा शरद पवार गटाला मोठा धक्का आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत शरद पवार गटाला वेगळ्या चिन्हावर आणि नावावर निवडणूक लढवावी लागणार आहे. अजित पवारांच्या गटाला राष्ट्रवादी चिन्ह आणि नाव गेल्यानंतर आता शरद पवार गटाला त्यांच्या नव्या पक्षाचे नाव आणि चिन्हाची सूचना ही बुधवारी संध्याकाळी ४ वाजेपर्यंत द्यावी लागणार आहे.

### शरद पवार गटाला सर्वोच्च न्यायालयात जाण्याची मूभा

**शरद पवार गटाला यावर सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय खुला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या निर्णयानंतर आता शरद पवार गट सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या या निकालाने येणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीत मात्र शरद पवार गटाचा कस लागणार असून त्यांना अजित पवार गटाच्या अनिल पाटलांचा व्हिप पाळावा लागेल, असे दिसत आहे.शिवसेनेत ज्या काही घडामोडी घडल्या त्याच पद्धतीने घडामोडी या नंतरच्या राष्ट्रवादीमध्ये घडल्या. अजित पवारांनी भाजपला साथ दिल्यानंतर बहुतांश आमदार हे त्यांच्यासोबत गेले आणि राष्ट्रवादीचा वाद हा निवडणूक आयोगामध्ये पोहोचला. निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला स्वतंत्र्य गट म्हणून मान्यता दिली आहे.**

## गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सुवर्णपदकाने सन्मान

### शिक्षण महर्षी स्व. मनोहरभाई पटेल जयंती समारोह ११ फेब्रुवारीला



**गोंदिया: –** भंडारा जिल्ह्याचे स्वनाम धन्य नेता व शिक्षण महर्षी स्व. मनोहरभाई पटेल यांच्या ११८ व्या जयंती निमित्त भंडारा–गोंदिया जिल्ह्यातील शालेय व पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार स्व. मनोहरभाई पटेल स्मृती सुवर्ण पदक वितरण कार्यक्रमात ११ फेब्रुवारीला करण्यात येणार आहे. येथील स्थानिक धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात ११ फेब्रुवारी २०२४ रोज रविवारला सकाळी ११ वाजता भव्य सुवर्ण पदक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे आयोजित सुवर्णपदक वितरण सोहळ्यात गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

सुवर्ण पदक वितरण समारंभ कार्यक्रमाचे उदघाटक देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री गोंदिया धर्मरावबाबा आत्राम उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खा. प्रफुल पटेल राहणार आहेत. कार्यक्रमाला इतर मान्यवर अतिथी उपस्थित राहणार आहेत.

सुवर्णपदकाने सन्मानित विद्यार्थ्यांमध्ये एस.एस.सी. मध्ये सर्वाधिक गुण प्राप्त गुजराती नॅशनल हायस्कूल, गोंदिया येथिल कु.संश्रुती सत्यशील चौहान, गोंदिया जिल्हा एस.एस.सी. मध्ये सर्वाधिक गुण कु.काजल जयपाल रुखमोडे. एच.एस.एस.सी. मध्ये एस.एम.पटेल कनिष्ठ महाविद्यालयातील महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक गुण प्राप्त कु. दिव्या ताकेश पहिरे, विवेक मंदिर कनिष्ठ महाविद्यालय येथिल कु.पर्व अजय अग्रवाल व राज्यात व्दितीय क्रमांक प्राप्त एस.एम.पटेल कनिष्ठ महाविद्यालय येथिल लक्ष्य नीरज अग्रवाल, बी.ए.मध्ये गोंदिया जिल्ह्यातील सर्वाधिक गुण प्राप्त एम.पी. महाविद्यालय देवरी येथील कु.अश्मिता सुरजलाल कोसरकर, बी.कॉम.मध्ये गोंदिया जिल्ह्यातील सर्वाधिक गुण प्राप्त एन.एम.डी महाविद्यालयातील कु.मेघा सुशील चौरसिया, बीएससी मध्ये गोंदिया जिल्ह्यातील सर्वाधिक गुण प्राप्त धोटे बंधू विज्ञान महाविद्यालय गोंदिया येथिल कु. प्रियांशी महेशसिंग राठोड, तसेच भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळवले आहेत त्यात एस.एस.सी मध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विकास हायस्कूल पवनी येथील कु. गार्गी विलास वैरागडे, एच.एस.सी मध्ये भंडारा जिल्हातील सर्वाधिक गुण प्राप्त नूतन गर्ल्स ज्युनियर कॉलेज, भंडारा येथून कु. नंदीनी संजय साठवणे, बी.ए.मध्ये भंडारा जिल्ह्यातून सर्वाधिक गुण जे. एम.पटेल महाविद्यालय, भंडारा येथील कु.मेघा विजय मित्रा, बी.कॉम मध्ये भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या जे. एम.पटेल महाविद्यालय, भंडारा येथील कु.साक्षी ताराचंद खंगार, बी.एस्सी. मध्ये भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या जे. एम.पटेल महाविद्यालय, भंडारा येथील कु. प्राची वामन लेंडे, बी.ई. मध्ये मनोहरभाई पटेल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, शहापूर (भंडारा) येथील हेमंत देवेंद्र बघेले यांचा गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये समावेश आहे.

सुवर्णपदक वितरण समारंभात नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्व.मनोहरभाई पटेल स्मृती समिती, श्री गुजराती राष्ट्रीय केलवाणी मंडळ, मनोहरभाई पटेल अकादमी, गोंदिया शिक्षण संस्था यांच्या वतीने श्रीमती वर्षाताई पटेल, माजी आमदार हरिहरभाई पटेल व माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले आहे.

## संदीप पाटील नक्षल विरोधी अभियानाचे “विशेष पोलीस महानिरिक्षक”

**गोंदिया:–** गडचिरोली–गोंदियाचे डीआयजी असताना संदीप पाटील यांचे कार्यालय नागपुरात होते. पदोन्नतीनंतर ते नागपुरातल्या नागपुरात एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बसणार आहेत. हे कार्यालय बदलताना त्यांच्या कामाचे स्वरुप मात्र आता व्यापक होणार आहे. गडचिरोली–गोंदियासह आता राज्यभरातील नक्षलवादी पाळेमुळे उखडून फेकण्याची महत्त्वाची जबाबदारी पाटील यांच्यावर असेल. विशेषत: छुपा शहरी नक्षलवाद हुडकून काढण्याचे काम त्यांना करावे लागणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नक्षल विरोधी अभियानाच्या विशेष पो–लीस महानिरिक्षकाची(आयजी) पदाची सूत्रे प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवश्यावर होती. आता पाटील ही जबाबदारी पेलणार आहेत.

“प्रसिध्दी”मध्ये न राहता आपले कर्तव्य चोखपणे बजावण–ारे अधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयपीएस संदीप पाटील यांना त्यांच्या कर्तबगारीचे बक्षीस मिळाले आहे. एकेकाळी गडचिरोलीमध्ये शेकडो नक्षल एन्काऊंटर करणारे पाटील आता नक्षल विरोधी अभियानाचे राज्याचे विशेष पोलीस महानिरिक्षक “आयजी’ झाले आहेत.



गडचिरोली पोलिस अधीक्षक पदाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर पाटील यांची पुणे येथे बदली झाली होती. कोविड काळात पाटील यांनी पुण्यात केलेल्या कामाची स्तुती राज्यभर झाली. पुण्यातून त्यांची पदोन्नतीवर उपमहानिरीक्षक (DIG) म्हणून गडचिरोली परिक्षेत्रात बदली झाली. पुण्यासारख्या शहरातून पुन्हा विदर्भात मिळालेली “पोस्टिंग’ पाटील यांनी स्वीकारत नक्षलवादी चळवळीचा बिमोड केला.

आयपीएस संदीप पाटील डीआयजी असतानाच मर्दीनटोलाच्या जंगलात झालेल्या चकमकीत नक्षलवादी चळवळीचा केंद्रीय नेता मिलिंद तेलतुंबडे ठार झाला. याच चकमकीत तब्बल २६ नक्षवादी ठार झाले होते. महाराष्ट्रापासून केंद्रापर्यत सर्वांनीच या कामगिरीचे कौतुक केले. जणू एखाद्या क्षेत्रात एख–ादा व्यक्ती पूर्णत: “मास्टरी” मिळवितो अगदी त्याच पद्धतीने संदीप पाटील यांनी नक्षलवाद विरोधी मोहिमेवर आपली “कमांड’ मिळविली आहे. त्यामुळेच कदाचित त्यांना याच विभागाच्या डीआयजी पदावरुन आयजी अशी पदोन्नती देण्यात आली असावी असे सांगण्यात येत आहे.

गडचिरोलीचे पोलिस अधी–क्षक असताना पाटील यांनी या नक्षलवाद प्रभावित जिल्ह्याचा बारकाईने अभ्यास केला. सीमावर्ती भागात चालणाऱ्या कारवायांवर त्यांनी अंकुश ला–वला. त्यांचा हाच अनुभव ते डीआयजी झाल्यानंतर गडचिरोली पोलिसांच्या कामी आला. अनेक चकमकींमध्ये गडचिरोली पोलिसांना जे यश आले, त्यामागे संदीप पाटील हे नाव घेतलेच जाते. गडचिरोली पोलिसांसोबतच पाटील यांचे स्वतंत्र असे “इन्फमेंशन नेटवर्क’ आजही कार्यरत असल्याचे सांगितले जाते. आपल्या या अनुभवाचा फायदा ते महाराष्ट्र पोलिस दलाला करुन देत आहेत.

### दोन कोटींच्या गांजासह तस्कराला अटक

**नागपूर :** महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) पथकाने गांजाची तस्करी करणाऱ्यास ट्रकसह पकडले. ही कारवाई बोरखेडी टोलनाक्यावर मंगळवारी पहाटेच्या सुमारास करण्यात आली. झडतीत ट्रकमधून एक कोटी ९५ लाख १० हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला. शंकर (४५) रा. विशाखापट्टनम असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आरोपीला न्यायालयात हजर करून त्याची मध्यवती कारागृहात रवानगी करण्यात आली. विशेष म्हणजे डीआरआयच्या पथकाने २०१९ मध्ये गांजाची सर्वात मोठी कारवाई केली होती. दिवाळी दरम्यान बोरखेडी परिसरात सापळा रचून २ हजार ८० किलो गांजा जप्त केला होता.ओडिशा आणि आंध्र प्रदेशात गांजाची मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. याच राज्यांतून देशभरात गांजाचा पुरवठा केला जातो. रेल्वे आणि रस्ते मार्गाने गांजाची वाहतूक केली जाते.

## ओबीसी जनगणना संकल्प यात्रेचे गोंदिया जिल्ह्यात उत्साहात स्वागत



**गोंदिया:** ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्यासंदर्भात वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथून ३ फेबुवारीला निघालेल्या ओबीसी जनगणना संकल्प यात्रेचे ६ फेब्रुवारी रोजी गोंदिया जिल्ह्यात आगमन झाले. या यात्रेचे स्वागत तिरोडा तालुक्यातील नवेगाव येथे करण्यात आले. यात्रेचे नेतृत्व ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोर्राम हे करीत आहेत.

यात्रेचे ओबीसी संघटनांच्यावतीने जिल्ह्याच्या सीमेवर जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, ओबीसी संघर्ष समितीचे कैलास भेलावे, राजीव ठकरेले, ओबीसी संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष राजू चामट, ओम पटले, उमेश कटरे, सी. पी. बिसेन, भारतीय पिछडा शोषित संघाचे प्रेमलाल साठवणे, बहुजन युवा मंचचे रवी भांडारकर, जिल्हा परिषदेचे सदस्य जगदीश बावनथडे, माजी जिल्हा परिषद सदस्य

मदन पटले, जीवन शरणागत, शिशुपाल पटले, भूमेश शेंडे, भूमेश्वर पारधी, प्रतिमा जयतवार, विवेक भांडारकर, रवी चामट, आशीष चौधरी, शामा शरणागत, जयप्रकाश शरणागत, जयराम गुणेवार, शालीकराम भेल–ावे आदि उपस्थित होते. यात्रा



नवेगाव येथून मुंडीकोटा, पांजरा, सरांडी, विहिरगाव, बिरसी फाटा, वडेगाव, डाकराम सुकडी, कुऱ्हाडी, कवलेवाडा, चुटीया, दासगाव, काटी, रावणवाडी, कामठा आदि गावात पोहोचून जनजागृती केली.

ही यात्रा १२ फेबुवारीपर्यंत विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर आदी जिल्ह्यांतून मार्गक्रमण करीत ओबीसींवर होणार्या अन्यायाला वाचा फोडणार आहे. यात्रेचा समारोप १२ फेब्रुवारीला चंद्रपूर येथे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा तपासण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यामार्फत २३ जानेवारी ते २ फेबुवारी या कालावधीत हे सर्वेक्षण करण्यात आले. ओबीसी राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालय खटला, रोहिणी आयोग, भारत सरकार व नीती आयोग नेहमी ओबीसी डेटाची मागणी करते. परंतु १९३१ पासून आतापर्यत ओबीसींची जातीनिहाय जनगणना न झाल्यामुळे भारत सरकारकडे हेटा उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक वेळा न्यायालयात अथवा धोरण ठरविताना शासनाला अनेक अडचणी येतात. त्यामुळे मंडल आयोगाने ठरविलेल्या ५२ टक्के ओबीसी समाजावर होत असलेल्या अन्यायाची माहिती देण्यात येत आहे.

बिहार राज्याची जनगणना यशस्वी झाली की आपणसुद्धा समिती तयार करुन जातीनिहाय जनगणना करु असे, २९ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्रातील विविध ओबीसी संघटना आणि राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यासह उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासित केले होते. ओबीसी समाजाकडून मागणी लावून धरली जात आहे. परंतु शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याची माहिती जनतेला जनगणने यात्रेच्या माध्यमातून देण्यात आली.

काटी ,दासगाव, येथे महात्मा फुले समिता परिषदेचे राजेश नागरीकर, गणेश बरडे, प्रमोदकुमार बघेले, रुवेंद



पाचे सरपंच बलमाटोला,माजी पंचायत समिती सदस्य रामराज खरे,राजकुमार मातरे,सुकलाल बाहे,मदन पांचे,रामप्रसाद पटले,हनसलाल



कहनावत,प्रल्हाद महंत,झनक पाचे,रामभगत पाचे तालुका अध्यक्ष ओबीसी सेवा संघ,श्री.भंडारी,चौधरी ,बालाराम खैरवार,केशवकुमार नागफासे,राजेश दंदरे,गुलाब पाचे,आकाश दंदरे,ओमकार नागफासे,भीकाराम माने,पंचायत समिती सदस्य राजेश जमरे,मोहपत खरे उपसरपंच ,सतीश मरठे,विनोद पाचे,सत्यवान माने,जगलाल चौधरी,संतोष चौधरी,फंदेलाल खैरवार,गुड्डू चौरावार,भारत पांचे,तिजुल माने,श्रीनत मातरे,रवि मंसूलाल जमरे,बंसी पाच,कैलाश जमरे,रोहिदास कावरे केंद्र अध्यक्ष मरार समाज कल्याण समिति काटी,हरी कटंगकर,बुधराम नागफासे,धर्मेन्द्र परिमल टंटा मुक्ति अध्यक्ष,मांगू पंजरे,अजय जमरे ग्रा प सदस्य,चंद्रकुमार चव्हाण,मोनू उईके,गजेन्द्र देवाधारी,गजेन्द्र उरकुडे,राजू तुरकर, दिनेश जमईवार,कैलाश गणवीर,कृष्णा पाचे,कपिल सोरले,संजू नेवारे,विनोद बनकर,सुनील गजभिए,राजेश मरठे,उमेंद्र देवाधारी,माधुरी जमरे,योगेश्वरी पंजर,सुखवंती जमरे महिला अध्यक्ष काटी,भूमेश्वरी देवाधारी उपस्थित होते. गोरेगाव कवलेवाडा येथे आर.आर.अगडे, भुमेश्वर ठाकरे, पारेश टेंभरे, डॉ. श्रीप्रकाश रहांगडाले आदिंनी यात्रेचे स्वागत केले.



तिरोडा तालुक्यातील सुकडी येथे जनजागरण यात्रे दम्यान मर्गदर्शन करताना उमेश कोर्राम.



बिरसी फाटा येथे ओबीसी जनगणना यात्रेचे स्वागत करताना पदाधिकारी.



तिरोडा तालुक्यातील वडेगाव येथे ओबीसी जनगणना यात्रेच्या स्वागत करिता उपस्थित नागरिक.

## संपादकीय

### ग्रंथालये : परिवर्तनाच्या वाटेवरील क्रांतिदूत

ग्रंथालये हा आपल्या समाजाचा श्वास आहे, ही जाणीव टप्प्याटप्प्यावर मला होत राहिली आहे. लहानपणी माझ्या विक्रोळीच्या उदयाचल शाळेत सुसज्ज ग्रंथालय होते. आमची शाळा आठ तासांची होती, त्यामुळे मधल्या सुट्टीत किंवा वाचनाच्या तासालाच तिथे जाण्याकरिता वेळ मिळायचा. पुढे सोमैया महाविद्यालयातले दोन मजली ग्रंथालय, तिथली आवडती जागा नि पुस्तकांची भरलेली कपाटे यांना माझ्या आयुष्यात फार मोठे स्थान आहे. १९६० सालापासूनच्या या ग्रंथालयात अगणित पुस्तके आहेत. मुक्तपणे कपाटे पाहता येतात, हे या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य, त्यामुळे हव्या त्या विषयावरची पुस्तके मनसोक्तपणे शोधता येतात. पुढे एम.ए.साठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला.

राजाबाई टॉवरमधील विद्यापीठाच्या ग्रंथालयाची वास्तू अविस्मरणीय आहे. तिथल्या ग्रंथालयात दिवसभर अभ्यास करण्यात अवर्णनीय आनंद असायचा. याच काळात दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची ओळख झाली. वृत्तपत्रीय कात्रणे, मासिके यांचे दुर्मीळ संदर्भ सापडले की, अमाप आनंद व्हायचा. माझ्या डॉक्टरेटच्या अभ्यासात ग्रंथालयांचे योगदान मोठे आहे. या सर्व ग्रंथालयांची आठवण आली, ती ठाणे जिल्ह्यातील ग्रंथालयांच्या अधिवेशनानिमित्ताने. ठाण्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय या अधिवेशनाच्या आयोजकांच्या प्रमुख भूमिकेत होते. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात रंगकर्मी सुहास जोशी यांचे भाषण ऐकले. रंगभूमीविषयक पुस्तकांमुळे होणारे संस्कार किती मोलाची भूमिका बजावतात, हे या भाषणातून त्यांनी सहज उलगडले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रदीप कर्णिक होते. रुपारेलसारख्या प्रथितयश महाविद्यालयाचे ग्रंथपाल, मराठी संशोधनपत्रिकेच्या संशोधनाचा अनुभव नि व्यक्तिमत्त्वाला व्यासंगी अभ्यासकाचे परिमाण यामुळे कर्णिकांचे भाषण ऐकण्याची उत्सुकता होती.

ग्रंथालय सेवकांची उपेक्षा नि त्यांना मिळणारे तुटपुंजे वेतन याकडे कर्णिक यांनी लक्ष वेधले. शासनाच्या प्रस्तावित "मराठी विद्यापीठा'त ग्रंथालये व ग्रंथालयशास्त्र, तसेच त्याविषयीचे अभ्यासक्रम यांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे हा मुद्दा मांडला. अनेक ग्रंथालयांची आजमितीला दुरवस्था झालेली आहे. धुळीने कपाटे भरली असतील, तर ग्रंथालय सेवकांना त्रास होऊ शकतो म्हणून त्यांनी आपली योग्य काळजी घ्यावी, असे मत साहित्यिक–समीक्षक डॉ. अनंत देशमुख यांनी आवर्जून व्यक्त केले. ग्रंथालये क्रांतीचे दूत बनून समाजात काम करतात. मात्र आपल्या समाजात त्यांचे मोल समजून घेतले जात नाही. वाचक आहेत तिथे ग्रंथालये अपुरी पडतात, तर ग्रंथालये आहेत तिथे वाचक नाही, अशी परिस्थिती आज आहे. कल्पक ग्रंथपाल वाचकांना वाचनाकडे आकृष्ट करतात.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनप्रेम रुजवणाऱ्या अतिशय मेहनती ग्रंथपालाशी नुकतीच माझी भेट झाली. परितोष पवार मुलुंडच्या केळकर महाविद्यालयात कार्यरत आहेत. वाचनकट्टा, बातमीपत्र, ग्रंथालयाची वेबसाइट, विशिष्ट विषयावरील पुस्तकप्रदर्शन, ई – वाचनस्त्रोतांचा उचित उपयोग एक ना दोन असंख्य उपक्रम परितोष राबवत आहेत. एखाद्या विद्यार्थ्याने एखादा विषय त्यांच्यासमोर मांडणे व त्या प्रकल्पाकरिता अनेक संदर्भांचा शोध ग्रंथपालांनी घेणे, हे पवार सर सातत्याने करत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज वाचनासाठी अनेक दिशा उपलब्ध आहेत. परितोष पवारांसारखा ग्रंथपाल याकरिता प्रयत्न करतो. ग्रंथपाल कल्पक नसेल, तर ग्रंथालयाची दुर्दशा होते. त्यामुळे नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या व अद्ययावत समकालीन ज्ञान असणारे ग्रंथपाल ही काळाची गरज आहे.

**डॉ. वीणा सानेकर**

# द्रष्टे कर्मयोगी मनोहरभाई पटेल



**अभिनंदन !**
**मनोहर नाम के जैसा मन है काम भी तो है,**
**मनोहर प्रेम भी तो है मनोहर दान भी तो है।**
**मनोहर पर तेरी भक्ती मनोहर की महाशक्ती**
**कार्य भी सब मनोहर हो कही तुकड्या यही सुमति।**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**



स्थानिक राजकारणात मनोहरभाईचे योगदान मोठे आहे. गोंदिया नगरपरिषदेचे अध्यक्ष म्हणुन मनोहरभाई पटेल यांची भुमिका महत्वपुर्ण आहे. १९३७ मध्ये गोंदिया न.प.चे सदस्य झाले. १९४६ मध्ये नगराध्यक्ष झाले. १९४६ ते १९६७ या २१ वर्षाच्या काळात ते पाच वेळा नगराध्यक्ष बनले. या काळात शहराच्या विकासात त्यांनी कुठलीही कसर सोडली नाही. याच कालावधीत त्यांनी क्षेत्रीय आणि प्रांतिय राजकारणात प्रवेश केला. १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवार बनविले. लोकप्रियतेमुळे ते प्रचंड बहुमतांनी विजयी झाले.

तत्कालीन मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार यांनी गोंदिया परिसराच्या विकासाची धुरा मनोहरभाईंच्या खांद्यावर दिली. जी त्यांनी चोखपणे निभावली. १९४० मध्ये गोंदिया तालुका काँग्रेस कमिटीचे सदस्य आणि १९५४ मध्ये अध्यक्ष बनले. १९५६ मध्ये भंडारा जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष बनले. कुशल नेतृत्वामुळे १९६२ मध्ये पुन्हा त्यांच्या खांद्यावर काँग्रेस अध्यक्षपदाची धुरा आली. १९५८ मध्ये नागपुर येथील काँग्रेस अधिवेशनाच्या स्वागत समितीचे कोषाध्यक्ष बनले. १९६२ मध्ये पुन्हा आमदार म्हणुन निवडुन आले. महाराष्ट्र राज्य बनल्यानंतर त्यांनी नागपुर काँग्रेस समितीचो कोषाध्यक्ष म्हणुन बरेच वर्ष कार्य केले.

**समाजसेवी**

मनोहरभाई एक कुशल व यशस्वी व्यवसायी तर होतेच लोकप्रिय समाजसेवी म्हणून ही त्यांची ओळख होती. त्यांनी भंडारा जिल्ह्यासोबतच भंडाऱ्याचे नेतृत्व केले. लोकसेवक म्हणून उल्लेखनीय कार्य केले.

गोंदिया नगर परिषदेचे नगराध्यक्ष म्हणून आदर्श सादर केले. उदामतवादी, मानवता,



संवेदनशिलता आदी गुणांचा त्यांच्यात समावेश होता. ते दानी व्यक्ती ही होते. त्यांनी नागपुर येथे धर्मपत्नी डाईबेन पटेल व येथे साकोलीत रूग्णालय निर्माण करून सर्व सामान्यांना आरोग्याची सोय उपलब्ध करून दिली. भारतीय संस्कृतीत अतिथीला भगवानाचे स्थान आहे. त्यानुसार मनोहरभाई येणाऱ्या प्रत्येक अतिथीला सन्मानाने वागणूक देत. त्यांच्या आतिथ्याने आलेले मान्यवर ही भारावून जायचे.देशातील राजकीय नेते, लेखक, कवी, कलाकार, साधू–संत, महात्मा आदी गणमान्य प्रतीष्ठित व्यक्तींशी त्यांचे संबंध होते. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद मनोहरभाईच्या जिवनकाळात गोंदियाला येवून गेले.

**गोंदिया शिक्षण संस्थेचे ज्ञानवृक्ष**

१९५८ गोंदिया शिक्षण संस्थेची स्थापना, १९५८ गोंदिया, नटवरलाल माणिकलाल दलाल कला–वाणीज्य महाविद्यालयाची स्थापना, १९६१ साली भंडारा–गोंदिया जिल्ह्यात एकावेळी २३ शाळा उघडल्या. आणि शिक्षण क्षेत्रात एक विक्रमच घडविला. योग्य वेळ येताच मनोहरभाईंनी या सर्व शाळा जिल्हा परिषदेला इमारतीसह हस्तांतरित केल्यात. मनोहरभाईंची ही कृती त्यांच्या ध्येय शक्तीचे व दानशूरपणाचे प्रतीक ठरले आहे.

१९६३ गोंदिया, पुंजाबाई पटेल शिक्षण महाविद्यालयाची स्थापना, १९६४ भंड़ारा, जे.एम .पटेल महाविद्यालयाची स्थापना, १९६५ तुमसर, सेठे नरसिंगदास मोर महाविद्यालयाची स्थापना, १९६६ तिरोडा, छोटाभाई जेठाभाई पटेल कला–वाणीज्य महाविद्यालयाची स्थापना, १९६६ गोंदिया ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना, १९६८ साकोली, मनोहरभाई पटेल कला– वाणीज्य



महाविद्यालयाची स्थापना, १९६९ गोंदिया, धोटेबंधु विज्ञान महाविद्यालयाची स्थापना, १९७० गोंदिया, श्रीमती सरस्वती महिला महाविद्यालयाची स्थापना, १९७० रामटेक (जिल्हा नागपुर) श्री नरेंद्र तिडके कला–वाणीज्य महाविद्यालयाची स्थापना, १९८३ गोंदिया, मनोहरभाई पटेल अभियांत्रीकी महाविद्यालयाची स्थापना, १९९० देवरी, मनोहरभाई पटेल महाविद्यालयाची स्थापना, १९९२ मोहाडी, एन.जे.पटेल महाविद्यालयाची स्थापना, १९९५ भंडारा, श्रीमती रेवाबेन पटेल कला महिला महाविद्यालयाची स्थापना, १९९५ सालेकसा, मनोहरभाई पटेल महाविद्यालयाची स्थापना, १९९७ गोंदिया, मनोहरभाई पटेल कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फॉम') ची स्थापना, २००४ गोंदिया, मनोहरभाई पटेल कॉलेज ऑफ फार्मसी (बी.फॉर्म) ची स्थापना, २००४ गोंदिया, मनोहरभाई पटेल मिलिट्री स्कुलची स्थापना, २००९ मध्ये एम.बी. पटेल महाविद्यालय पवनी,लाखांदूर व सडक अर्जुनी येथे सुरु करण्यात आले. एम.बी.पटेल शिक्षण महाविद्यालय तुमसर व भंडारा येथे २००९ मध्ये सुरु करण्यात आले आहे.

२०१० मध्ये मनोहरभाई पटेल अभियांत्रिक महाविद्यालय भंडारा. या व्यतिरिक्त १४ विद्यालय व २ आश्रमशाळा कार्यान्वित आहे. मनोहरभाई पटेल यांची ख्याती व्यावसायीक, औद्योगीक, सामाजिक व राजनैतिक एवढीच नव्हती, तर त्यांच्या विविध क्षेत्रातील उपलब्धी यांचा उल्लेख करण्याचा संबंध नाही. जागतिक दर्जाच्या उच्च व अद्ययावत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ना.पटेल यांचे प्रयत्न सुरू असून गोंदियात शासकीय, वैद्यकीय महाविद्यालये व तंत्रशिक्षण महाविद्यालयाची मंजुरी ही मिळवून दिली आहे. भंडारा–गोंदिया जिल्हे शैक्षणिक दृष्ट्या संपन्न व्हावेत हा ध्यास धरून स्व.मनोहरभाईंच्या स्वप्नांना साकार करणारा प्रफुलभाई सारखा पुत्र प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीप. असाच म्हणावा लागेल.

सार्वजनिक व सामाजिक जिवनात त्यांची एक वेगळीच ओळख होती. त्यामुळेच कै.मनोहरभाईंची किर्ती ही जनमनसात अशीच रूजत राहील. त्यांच्या ११८ व्या जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन.



## जलयुक्त शिवार अभियान २.०; जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिवपद जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे



**मुंबई :** जलयुक्त शिवार अभियान २.० जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे तर तालुकास्तरीय सदस्य सचिव तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० च्या प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य सचिव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

जलयुक्त शिवार अभियान २.० चा आढावा, सनियंत्रण व कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती तसेच तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी (प्रांत) च्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठित करण्यात आलेली आहे.

जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग हे आहेत. तालुकास्तरीय समितीचे सदस्य सचिव उपविभागीय जलसंधारण अधिकारी हे होत. आता जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय समितीचे सदस्य सचिव बदलून जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव पद जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे व तालुकास्तरीय समितीचे सदस्य सचिव पद तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

तसेच केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा पाणलोट कक्ष व माहिती केंद्र (WCDC) या समितीची फेररचना करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना–पाणलोट विकास घटक २.० च्या प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य सचिव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय मृद व जलसंधारण विभागाने निर्गमित केला आहे.

## "स्पर्श'' कुष्ठरोग जनजागृतीसाठी गोंदियावासी धावणार

**गोंदिया :** केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत जिल्ह्यात "स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियाना दरम्यान जनजागृती व सर्वेक्षणावर विशेष भर देण्यात येत आहे. या अभियाना दरम्यान नागरिकांनी कुष्ठरूग्ण आजाराबाबत गैरसमज व भीती न ठेवता आपल्याला होणारा त्रास न लपवता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. कुष्ठरूग्णांसोबत समाजात भेदभाव न होता सन्मानाने जगण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करावे व प्रत्येक कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी होणाचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

"स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान पंधरवड्यात नुक्कड नाटकद्वारे जनजागृती, कुष्ठरोगमुक्त झालेल्यांचे मनोगत, खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची कार्यशाळा, शाळेमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग बाबतच्या प्रतिज्ञांचे वाचन, शाळेतील सूचना फलकावर कुष्ठरोग बाबतचे संदेश, शाळा व गावांमध्ये नुक्कड–नाटक, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, कविता वाचन, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य व कुष्ठरोगावरील म्हणी/घोषवाक्य स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी तसेच कुष्ठरोग दौड मॅरेथॉनचे आयोजन इत्यादी विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून गोंदिया जिल्ह्यात दिनांक ८ फेब्रुवारी रोजी कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉन राबविण्यात येत असल्याची माहिती डॉ. रोशन राऊत यांनी दिली आहे. मॅरेथॉन रॅली सकाळी ८ वाजता जयस्तंभ चौक येथून सुरुवात होणार असून ते आमगाव रोड वरुन सारस चौक जिल्हा परिषद येथे समापन होणार आहे.

तरी गोंदियावासीयांनी जास्तीत जास्त संख्येने कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन कुष्ठरोग आजाराला हरविण्यासाठी आरोग्य विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.रोशन राऊत यांनी केले आहे. मॅरेथॉन रॅली विजेत्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.रोशन राऊत म्हणाले, कुष्ठरोगाचे प्रमाण दर १० हजारी १ पेक्षा कमी करणे, कुष्ठरोग विकृती दर्जा २ प्रमाणे शुन्य आणणे, कुष्ठरोगाबाबत असलेली अंधश्रद्धा व गैरसमज दूर करणे, कुष्ठरोगाबाबतची जनजागृती ग्रामीण व शहरी भागातील तळागाळापर्यंत पोहोचुन कुष्ठरोगमुक्त भारत हा संकल्प साध्य करणे हा या "स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियानाचा उद्देश असुन अभियानात "कलंक कुष्ठरोगाचा मिटवुया, सन्मानाने स्विकार करुया" याचा सर्वत्र जागर करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कुष्ठरूग्ण हा आजार संपुर्ण उपचाराने बरा होवू शकतो. म्हणुन नागरिकांनी प्राथमिक स्तरावर जाणवणारे लक्षणे आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रात जावुन तपासणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. लवकर निदान, तत्पर उपचार केल्यास कुष्ठरूग्ण नक्कीच हमखास बरा होवु शकतो. या आजारावरील औषधी सर्व सरकारी रुग्णालयात मोफत उपलब्ध असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे यांनी सांगितले.

## सलग्न चौथ्या वर्षीही निरोगी आरोग्य व प्रदूषण मुक्त वातावरणासाठी माँ बम्लेश्वरीची सायकलवारी

■ एक दिन सायकल के नाम चा अभिनव संदेश
■ मातृ पितृ दिवससाचे अवचित्त साधत ११ फेबुवारिला गोंदिया ते डोंगरगड गोंदिया सायलकल वारी
■ सतत तिन वर्षा पासून सुरु असून चौथ्या वषी ही गोंदिया ते डोंगरगड ते गोंदिया सायलकल वारी



**गोंदिया:–** दिवसेंदिवस वातावरणात बदल होत, असल्याने ग्लोबल वॉर्मिंग चे संकेत मिळत आहे. याला मुख्य कारण म्हणजे विविध प्रभूषण आहे, या प्रभूषणावर नियंत्रण मिळविण्या साठी गोंदियाकरांनी 'एक दिन सायकल के नाम' हा उपक्रम वर्ष २०१७ पासून हातात घेतले आहे. प्रत्येक आढवाड्याच्या रविवार ला सकाळी १५ ते २० किलो मीटर ने सायकल चालवून प्रदूषण मुक्त व निरोगी आरोग्याचा संदेश देण्यात येत आहे. आता हाच संदेश छत्तीसगड, मध्येप्रदेश राज्यातही पोहचावा या उद्देशाला घेऊन माँ बम्लेश्वरी चे धाम म्हणून प्रशिध्द असलेल्या छत्तीसगड राज्यातील डोंगरगड येथे मातृ पितृ दिवससाचे अवचित्त साधत मागील तीन वर्ष पासून गोंदिया ते डोंगरगड सायकल वारी करत असुन या चौथ्या वर्षी सुद्धा ११ फेब्रुवारिला गोंदिया हुन ३५ ते ४० युवक–युवती सायकल ने गोंदिया ते डोंगरगड यात्रा करून माता बम्लेश्वरी चे दर्शन घेण्यात येणार आहे. तर दुसऱ्या दिवशी वर्ष २०१७ पासून संडे सायकलिंग ग्रुप तयार करण्यात आले असुन या माध्यमातुन 'एक दिन सायकल के नाम' हे उपक्रम गोंदिया शहरातून सुरु करण्यात आले. प्रत्येक रविवार ला सकाळी एक ते दीड तास सायकल चालवून शहरातील नागरिकांना निरोगी आरोग्य व प्रभूषण मुक्ती साठी संदेश देण्यात येत आहे. या अभियानातील दोन युवक अमन व शांती, निरोगी आरोग्य, प्रभूषण मुक्त भारत चा संदेश घेऊन तब्बल हजारो किलो मीटर ची यात्रा करून बाघा बॉडर जम्मू–काश्मीर पर्यंत पोहचले या अभियानाचा महत्व बघून अभियानाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

या अभियानाच्या माध्यमातून इंधन बचत, निरोगी आरोग्य व प्रभूषण पासून दूर होण्यासाठी शेकडो युवकांनी सायकल चालविण्यास सुरवात केली आहे. आता हाच संदेश लगतच्या राज्यात हि पोहचावा या उद्देशाला मागील तिन वर्षापासून छत्तीसगड राज्यातील डोंगरगड येथील प्रसिध्द माँ बम्लेश्वरी चे दर्शन घेण्यासाठी व हा संदेश हजारो भक्तांच्या माध्यमातून पोहचावा म्हणून जात असुन या यावर्षी सुद्धा गोंदियातुन ११ फेबुवारी रविवारला सायकल यात्रा करत डोंगरगडला पोहचणार आहे. या सायकल यात्रेला उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया व युनायटेड हॉस्पिटल हे हिरवी झेंडी दाखवून यात्रेची सुरवात करणार आहेत. तसेच आमगाव येथे श्री जीवन गौरव फाउंडेशन व श्री महाकाल सेवा समिती द्वारे स्वागत करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे सालेकसा या ठिकाणी सुद्धा या यात्रेच्या सायकलिस्ट चा स्वागत सालेकसा पोलीस द्वारा करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे दरेकसा येथे दिशा आरोग्य कुटीर द्वारा स्वागत करण्यात येणार आहे. तसेच डोंगरगड येथे वामा सुरक्षा दलद्वारे स्वागत करण्यात येणार आहेत. तर या अभियानात सामील होण्याचे आवाहन तसेच देशाला प्रदूषण मुक्त करण्यासाठी व आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी या सायकल यात्रे मध्ये इच्छुक युवक–युवती यांनी सामील व्हावे. इच्छुकांनी या अभियानात सामील होण्यासाठी सायकलिंग ग्रुपच्या या संपर्क क्रमांक ०९८२३५७४८८०, ०९८२३९५३३९५, ०७९७२१७२२७० वर संपर्क करावे असे आव्हान मंजू कटरे, रवी सपाटे, विजय येडे, अजित शेणमारे, नवीन दहिकर, आर्यन कुंभलवार, दीपाली वाढई, वैशाली भांडारकर, आशा तिडके, त्रिवेणी उईके, निखिल बाहेकार, अरुण बंनाटे, विशाल ठाकूर, दीपक गाडेकर, जितेंद्र खरवडे यांच्याशी करावे.



परिसराच्या चौफेर विकासाचा ध्यास घेतलेले मनोहरभाई पटेल यांनी शुन्यातून विश्व निर्माण केले. शिक्षण, समाजकारण, राजकारण, उद्योग अशा विविध क्षेत्रात आपल्या कतृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या मनोहरभाईंचे कार्य निश्चीतच प्रेरणादायी असे आहे. या सेवेमुळेच त्यांची आजही चर्चा आहे. सर्व साधारण कुटुंबात ९ फेब्रुवारी १९०६ ला गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्याच्या नाडीयाद या गावात जन्मलेल्या मनोहरभाई पटेल यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे अनेकांशी ऋणानुबंध निर्माण झाले.

गोंदिया शहरामध्ये आल्यानंतर त्यांनी मेहनत आणि चिकाटीने काम करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. अशा या थोर व्यक्तीमत्वाची आज ११७ वी जयंती साजरी होत आहे.

तत्कालीन भंडारा जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे अतुलनीय असेच आहेत. सिंचनाचा प्रश्न असो वा शिक्षणाचा उद्दात्त हेतू समोर ठेवून त्यांनी काम केले. त्यामुळेच देवरी तालुक्यात तत्कालीन मध्यप्रदेश सरकार व महाराष्ट्र सरकारच्या माध्यमाने मनोहरसागर जलाशय तयार झाला. या जलाशयाच्या पाण्यामुळे परिसरातील हजारो एकर जमीन सिंचनाखाली आल्याने येथील शेतकरी समृद्ध बनला आहे. तर उदार दुरदृष्टीकोन समोर ठेवून त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांसाठी शिक्षणाची दारे उघडी करून दिली. बुद्धीमत्ता आणि कार्यप्रणालीने त्यांची ख्याती पश्चिमेत मुंबई तर उत्तरेत दिल्लीपर्यंत पोहोचली.

समाजसेवेसाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या मनोहरभाईंनी सर्वच वर्गांना समाज दर्जा दिला. त्यांचा शब्द म्हणजे प्रमाण असायचा. कोणतेही काम एकदा हाती घेतले की, ते पूर्ण होईपर्यंत थांबायचे नाही ही त्यांची जिद्द, या वृत्तीची आज राजकारण, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात त्यांच्या विचारांना सर्वोच्च प्राथमिकता मिळत आहे. अत्यंत साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि कार्यामुळे ते सर्वसामान्य हृदयात रूजले आहेत. आर्थिक परिस्थिती बेताचीच असतांना सर्वसाधारण बिडी उद्योगापासून सुरूवात करीत त्यांनी मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उद्योगात वेगळे स्थान निर्माण केले. आपण शिक्षण घेऊ शकलो नाहीत याची जाणीव असतांनाही त्यांनी इतरांना शिक्षीत करण्याचा ध्यास घेतला. संकल्पनशक्ती जीवनात काही नविन करून दाखविण्याची जिद्द आणि दुसऱ्याची सेवा करण्याची इच्छा यातून त्यांनी ध्येय साध्य करून दाखविले. सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात त्यांनी प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये उडघली. गोंदिया शिक्षण संस्थेची निर्मिती करून २२ शाळा जिल्हा परिषदेला दान केल्या. त्यामुळे ते स्वनामधन्य नेते नव्हे तर शिक्षणमहर्षी ठरले आहेत. गोंदिया शहरात अभियांत्रीकी महाविद्यालय, सैनिकी शाळा आणि वैद्यकिय अभ्यासक्रमाचे शिक्षण सुरू झाले आहे.

त्यांचे पुत्र या नात्याने प्रफुल्लभाई पटेल हे त्यांच्याच पावलांवर चालून नविन किर्तिमान प्रास्थापित करीत आहेत. प्रफुल्लभाई यानी केंद्रात नागरी उड्डयणमंत्री व केंद्रीय अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम मंत्री पद सांभाळून आपल्या वडीलांच्या कार्याला हातभार लावत उद्योग व सिंचनाकडे विशेष लक्ष दिले आहे.आता तर त्यांनी क्रिडा क्षेत्रात फुटबॉल असो.चे मुख्य पदाची सुत्रे आपल्या हाती घेत फुटबालला सुध्दा नवी ओळख मिळवून देण्याचे काम सुरु केले आहे.त्यांच्याच पुढाकाराने केंद्रीय विद्यालय सुध्दा गोंदिया जिल्ह्यात सुरु झाल्यास नवी शिक्षणात क्रांती होईल व या स्वनामधन्य नेतृत्वाच्या गोंदिया–भंडारा जिल्ह्यातील शैक्षणिक क्रांतीत नवे एक पाऊल टाकले जाईल अशी अपेक्षा ठेवली जात आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात स्थानिक उमेदवारालाच संधी-माजी आमदार कुथे

**गोंदिया:–** भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघात कोणत्याच पक्षाने बाहेरचा उमेदवार लादू नये.मूळच्या स्थानिक व्यक्तीला संधी द्यावी. तसेही आमचे विद्यमान खासदार सुनिल मेंढे हेच पहिल्या पसंतीचे उमेदवार असल्याने मतदारसंघाबाहेरील व्यक्तीला उमेदवारी देण्याचा प्रश्नच येत नसल्याची प्रतिक्रिया माजी आमदार रमेश कुथे यांनी व्यक्त केली. ते गोंदियातील शासकीय विश्रामगृहात भारतीय जनता पक्षाच्या गाव चलो अभियानाची माहिती देण्याकरीता आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकांराच्या प्रश्नाला उत्तर देतांना बोलत होते. पत्रपरिषदेला खासदार सुनिल मेंढे, भाजप जिल्हाध्यक्ष एड.येशुलाल उपराडे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहागंडाले, संघटनमंत्री विरेंद्र अंजनकर, ओबीसी आघाडी जिल्हाध्यक्ष



गजेंद्र फुंडे, शहर भाजप अध्यक्ष अमित झा, महिला आघाडी प्रमुख भावनाताई कदम, जयंत शुक्ला यावेळी उपस्थित होते.

गोंदिया–भंडारा हा लोकसभा मतदारसंघ सर्वसाधारण असून भाजपकडे विद्यमान खासदारासंह इतर नेत्यांनीही लोकसभा निवडणुक लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे.सामान्य कार्यकर्त्यापासून सर्वांनाच उमेदवारी पक्षाकडे मागण्याचा अधिकार असून स्थानिक मतदारसंघातील रहिवासी असलेला उमेदवारालाच प्राधान्य दिले जाते.परंतु पक्षाने काही ठरविले असल्यास पक्ष ज्यांना उमेदवारी जाहिर करेल त्यांच्या पाठिशी आम्ही उभे राहू असे खासदार सुनिल मेंढे म्हणाले. तर माजी आमदार कुथे यांनी भंडारा–गोंदिया जिल्ह्यातील आजपर्यंतची परंपरा ही स्थानिक उमेदवाराप्रतीच दिसून आलेली आहे. त्यामुळे स्थानिक उमेदवारालाच पक्ष संधी देईल पण सर्वानांच आपले शक्तीप्रदर्शन करायला मोकळीक असल्याचेही म्हणाले. संविधाननिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अर्थतज्ञ अशोक मेहता, डॉ.श्रीकांत जिचकार सारख्या महानुभवांना या मतदारसंघाने बाहेरील उमेदवार म्हणून नाकारल्याच्या इतिहास आहे. त्या इतिहासाला बदलण्याकरीता काही प्रयत्न करीत असतील तर त्यांना आम्ही थांबवू शकत नसल्याचेही अप्रत्यक्षपणे कुथे यांनी सांगितले.

पक्षातील मातब्बर नेते स्थानिकांना डावलून बाहेर जिल्ह्यातला उमेदवार उभा करतात आणि त्याला निवडून आणण्यासाठी ताकद पणाला लावतात. स्थानिकचा उमेदवार निवडून आल्यास भविष्यात तो मोठा होईल आणि आपल्या शक्तिस्थळांना आव्हान देऊ नये अशी तजवीज केली जाते. उमेदवार बाहेरून आयात करायचा. त्याला निवडून आणायचे, पाच वर्षे त्याच्या माध्यमातून सत्ता राबवायची. तो सोयीचा असेल तर त्याला पुन्हा संधी द्यायची, जड होत असेल तर पुन्हा दुसरा उमेदवार आयात करायचा आणि त्याला निवडून आणायचे असेच राजकारण राखीव मतदारसंघात नेहमीच दिसून येतात मात्र आता सर्वसाधारण मतदारसंघातही याचा शिरकाव झाल्याची चिंता नेत्यांच्या चेहर्यावरील भावनांतून दिसून येत होती.

# "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" अभियानात राज्यात गोंदिया जिल्हा अव्वल

**गोंदिया :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमंच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्याथी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी राबविण्यात येत आहे. हे अभियान राबविण्यात राज्यात गोंदिया जिल्हा आजघडीला अव्वलस्थानी आहे.

"मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानांतर्गत शाळांमध्ये भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ व प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे योजनेसाठी निश्चित करण्यात आली आहेत. ही योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसह सर्व व्यवस्थापनांच्या शाळेत




राबविण्यात येत आहे. गोंदिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील १६५९ शाळांत हे अभियान राबविण्यात येणार आहे. यातील ११५९ शाळा अभियानात सहभागी झाल्या असून ४२६ शाळांत अभियान पूर्णपणे राबविण्यात आले आहे. तर उर्वरित ७४ शाळा लवकरच अभियानाची अंमलबजावणी करणार आहेत.

उल्लेखनीय म्हणजे, अभियान राबविण्यात गोंदिया जिल्हा राज्यात अव्वलस्थानी आहे. त्याखालोखाल धुळे, हिगोली जिल्हा आहे. आदिवासीबाहुल्य, नक्षलग्रस्त अशी ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात असल्याने भविष्यात याचा लाभ जिल्ह्यातील शाळा, पर्यायाने विद्यार्थ्यांना मिळणार अशा आशावाद गोंदियाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी व्यक्त केला आहे.

# १९ फेब्रुवारीला श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला जाणार

**गोंदिया:–** अनेक वर्षांपासून मराठा समाज छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्याच्या प्रतीक्षेत होता. पुतळ्यासाठी शहरातील मनोहर चौकात असलेली ५७२ चौरस फूट शासकीय जागा निवडण्यात आली होती.गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२३ मध्ये समाज आणि इतर सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा १३ फूट उंच अश्वारूढ पुतळा गोंदियात आणत ढोल–ताशांच्या गजरात स्वागत केले. परंतु प्रशासकीय स्तरावर पुतळा बसविण्याची परवानगी नसल्याने पुतळा बसवता आला नव्हता.मात्र माजी पालकमंत्री डॉ.परिणय फुके यांनी पुढाकार घेत २ फेबुवारीला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेत समाधानकारक तोडगा काढला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवणे हा धार्मिक हेतू नाही. हा राष्ट्रीय अभिमानाचा विषय आहे. त्यामुळे पुतळा बसवावा. याबाबत प्रशासकीय




पातळीवर सहमती व्यक्त करत मराठा समाजाला पुतळा बसविण्यास परवानगी देण्यात आली.लवकरच शासकीय पातळीवर मराठा समाज समितीच्या देखरेखीखाली पुतळा शासकीय ठिकाणी बसवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहेत. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्यात महाराजांच्या पुतळ्यासाठी निश्चित केलेली जागा राज्य सरकार समाजाला समर्पित करेल, असा मला विश्वास आहे.

यावेळी मराठा समाजाने माजी पालकमंर्त्यांचे आभार मानले. १९ फेब्रुवारीला या पुतळ्याची भव्य स्वरुपात प्रतिष्ठापना होणार असून, सोहळ्याचा जल्लोष संपूर्ण गोंदिया पाहणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी आमदार विजय रहांगडाले, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपात्रे, तहसीलदार समशेर पठाण, पीआय चंद्रकांत सूर्यवंशी, मराठा समाजाचे माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, दीपक कदम, संतोष जाधव, राजेंद्र जगताप, सीमाताई बढे , अमृत इंगळे , आलोक पवार , भावनाताई कदम , दत्ता सावंत , प्रतीक कदम , अमित झा , श्री काळे, रमेश दलदले, बाळाराम व्यास यांच्यासह अनेक मराठा समाज व इतर समाज बांधव उपस्थित होते.

# शिक्षकांचा नक्षलभत्ता मंजूर : थकबाकी मिळणार

**गोंदिया :** ६ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयानुसार उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या आदेशाचा संदर्भ घेऊन सर्व शिक्षकांना १५०० रुपये नक्षलभत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता थकबाकीसह देण्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी आदेश काढला आणि त्या आदेशानुसार सर्व शिक्षकांना १५०० रुपये नक्षलभत्ता व घरभाडे भत्ता लागू केलेले आहे. संबंधित आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व शिक्षक कर्मचारी यांना थकबाकी मिळावी म्हणून शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निधीची मागणी केली होती. त्यानुसार थकबाकी बाबतचा निधी जिल्हा परिषद गोंदियाला प्राप्त झाला आहे आणि ही थकबाकी जिल्ह्यातील सर्व शिक्षक कर्मचा?यांना मिळणार आहे. या संदर्भात थकबाकी शालार्थ प्रणालीने शिक्षक कर्मचारी यांना मिळावी म्हणून शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी पत्रव्यवहार करुन शालार्थ प्रणाली ढरल उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती केली आहे.जिल्हा प्रशासनाच्या नावावर कुणीही सदर थकबाकी मिळवून देण्यासाठी जर पैशाची/आर्थिक मागणी करीत असतील तर कुणीही अशा लोकांना बळी पडू नये. असे आवाहन डॉ. महेंद्र गजभिये, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांनी केले आहे.

# जिल्हा न्यायालयात कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम साजरा

**गोंदिया :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय व जिल्हा वकील संघ गोंदिया यांच्या संयुक्त वतीने २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिवस निमित्ताने जिल्हा न्यायालय गोंदिया येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ए. एम. खान जिल्हा न्यायाधीश–१, एन. डी. खोसे जिल्हा न्यायाधीश–२, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एस. व्ही. पिंपळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ?ड. सी. के. बडे, तसेच मार्गदर्शक म्हणून उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर त्याचप्रमाणे सर्व न्यायीक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी व सर्व वकील वर्ग कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रारंभी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी सर्व उपस्थितांना दिली. यावेळी श्री. वानखेडे म्हणाले, मताधिकार राष्ट्राच्या उभारणीत किती महत्वपुर्ण कार्य बजावते तसेच मताधिकार करण्याचे अधिकार भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना देवून सामाजिक एकता स्थापित केली. मताची किंमत प्रत्येक मताधिकार बजावणाऱ्यांनी जोपासायला हवी. कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता निरपेक्ष भावनेने मताधिकार बजावायला हवे. मताधिकार करणे हे राष्ट्रीय कर्तव्य समजून व कुठलीही पुर्व भावना न ठेवता मताधिकार बजावायला हवे असे त्यांनी सांगितले.

किरण अंबेकर यांनी मताधिकार व मतदार दिवसाचे उद्देश, मताधिकाराची आवश्यकता, मताधिकार लोकशाही, राष्ट्र निर्मिती व राष्ट्राच्या विकासाकरीता महत्व काय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ?ड. शबाना अंसारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार ॲड. मंगला बंसोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया येथील कर्मचारी अधीक्षक पी. बी. अनकर, कनिष्ठ लिपीक ए. एम. गजापुरे, एस. एम. कठाणे, पी. एन. गजभिये, एस. डी. गेडाम, पी. डी. जेंगठे, के. एस. चौरे, एल. ए. दर्वे तसेच शिपाई बी. डब्ल्यु. पारधी, आर. ए. मेंढे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ११ ते १५ फेबुवारी पर्यंत महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन

**गोंदिया :–** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रमाचे आयोजन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे. राज्यातील विविध प्रांतातील संस्कृतीचे आदान–प्रदान, स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चाललेल्या कला व संस्कृतीचे जतन व संवर्धन, तसेच स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात–अज्ञात लढवयांची माहिती इत्यादी बाबी जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर महोत्सवाची प्रभावीपणे अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकतेच महासंस्कृती महोत्सवाच्या आयोजनाबाबत आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते.

श्री. गोतमारे म्हणाले, दिनांक ११ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान इंदिरा गांधी स्टेडियम, गोंदिया येथे महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर महोत्सव सर्वांसाठी नि:शुल्क राहणार आहे. जवळपास ८ हजार नागरिक बसु शकतील अशी बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या महोत्सवात झाडीपट्टीतील कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यावेळी सांस्कृतिक रंगमंचावरील कार्यक्रम, महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारे कार्यक्रम, शिवचरित्रावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, लोककलेतील विविध प्रकार जसे–पोवाडा, भारुड, खडीगंमत इत्यादी, विविध भागातील तसेच स्थानिक दुर्मिळ व लुप्त होणाऱ्या लोककला व संस्कृती यांचे कार्यक्रम, देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम, महाराष्ट्राची हास्य जत्रा, जिल्ह्यातील स्थानिक उत्सव कार्यक्रम, गोंडी नृत्य इत्यादी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.


## ग्राम पंचायत येरंडी/देवल
### पं.स.अर्जुनी मोरगाव, जि.गोंदिया
### निविदा सुचना

ग्राम पंचायत येरंडी/देवल येथे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छ भारत मिशन ग्रा टप्पा–२ अंतर्गत मंजूर झालेल्या बांधकामाकरिता नोंदणीधारक कंत्राटदाराकडून खुली निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १५ वित्त आयोग अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन | २,२०,८७४/– | ५००/– | २२०९ |
| २ | स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा–२ अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन | ४,९८,३२६/– | | ४९८३/– |

दिनांक ०७/०२/२०२४ ते ११/०२/२०२४ पर्यंत ग्रा.पं.येरंडी/देवल येथे कार्यालयीन वेळेत पोहोचते करावे.

**दिपक गो.कुंभरे**
सरपंच
ग्रा.पं.येरंडी/देवल

**सुषमा डी.वाढई**
ग्रामसेवक
ग्रा.पं.येरंडी/देवल


# वैज्ञानिक जाणिवा समृद्धीसाठी विज्ञान प्रदर्शनाची आवश्यकता: पंकज रहांगडाले



**गोंदिया:–** विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक, पालक यांच्यामध्ये वैज्ञानिक जाणिवा समृद्ध व्हाव्यात यासाठी विज्ञान प्रदर्शनाची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले आहे. श्री राजस्थान कन्या विद्यालय, गोंदिया येथे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. विज्ञान प्रदर्शनामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांसह खाजगी व्यवस्थापनाच्या शाळाही सहभागी होत असल्याने संपूर्ण जिल्हाभरातून उत्तम साहित्य याठिकाणी येत असल्याने सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

आजच्या मानवी जीवनातील प्रगती ही विज्ञानाची देणगी आहे, त्यामुळे भविष्याचा वेध घेऊन सर्व शाळांमधून विज्ञान विषय प्रात्यक्षिकांद्वारेच शिकविला जाणे आवश्यक असल्याचे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केले. विज्ञान विषयाने घेतलेली भरारी, वैज्ञानिक विश्वातील सद्यस्थिती, विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कौशल्य, तंत्रज्ञान, आरोग्य व संस्कारांची खूप गरज असल्याचे विचार त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून व्यक्त केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, उपाध्यक्ष यशवंत गणवीर, समाज कल्याण सभापती पूजा सेठ यांचीही यथोचित भाषणे झाली.

यावेळी वैज्ञानिक प्रयोगाने उद्घाटन झाले. माध्यमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी प्रास्ताविक केले तर प्राथमिक शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी पंचायत समिती, गोंदियाचे सभापती मुनेश रहांगडाले, जिल्हा परिषद सदस्य डॉ.लक्ष्मण भगत, शैलेश नंदेश्वर, सौ.नेहा तुरकर, सौ.छबूताई उके, सौ.वंदना काळे,विमल कटरे, मारवाडी युवक मंडळ संस्थेचे पदाधिकारी, उपशिक्षणाधिकारी लांडे, दिघोरे, गोंदिया गटशिक्षणाधिकारी राऊत, तिरोडा गटशिक्षणाधिकारी चौधरी, विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक श्रीमती पुरोहित इ.उपस्थित होते. तसेच विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुष्ठरोग मुक्त भारत संकल्प साध्य करण्यासाठी स्पर्श अभियान- डॉ.रोशन राऊत

**गोंदिया :** केन्द्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत जिल्हयात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना दरम्यान जनजागृती व सर्वेक्षणावर विशेष भर देण्यात येणार आहे. कुष्ठरोगा बाबतची जनजागृती ग्रामीण व शहरी भागात तळागाळापर्यंत पोहचवुन कुष्ठरोग मुक्त भारत हा संकल्प साध्य करणे हे हया स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाचा उद्देश असल्याची माहिती सहायक संचालक आरोग्य सेवा ( कुष्ठरोग) डॉ. रोशन राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिली. अभियाना दरम्यान नागरीकांनी कुष्ठरोग आजाराबाबत गैरसमज व भीती न ठेवता आपल्याला होणारा त्रास न लपवता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

कुष्ठरोग हा आजार संपुर्ण उपचाराने बरा होऊ शकतो, म्हणुन नागरीकांनी प्राथमिक स्तरावर जाणवनारे लक्षणे आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करणे आवश्यक आहे. लवकर निदान व तत्पर उपचार केल्यास कुष्ठरोग नक्कीच हमखास बरा होतो. या आजारावरील औषधी सर्व सरकारी रुग्णालयात मोफत उपलब्ध आहे. कुष्ठरुग्णाचे प्रमाण दर दहा हजारी लोकसंख्या मागे १ पेक्षा कमी करणे, कुष्ठरोग विकृती दर्जा २ चे प्रमाण शून्य आणणे, कुष्ठरोगाबाबत असलेली अंधश्रध्दा व गैरसमज दूर करणे, कुष्ठरोगा बाबतची जनजागृती ग्रामीण व शहरी भागात तळागाळापर्यंत पोहचवुन कुष्ठरोग मुक्त भारत हा संकल्प साध्य करणे हे हया स्पर्श कुष्ठरोग जनजागृती



अभियानाचे उद्देश आहे.

यावर्षी अभियानात कलंक कुष्ठरोगाचा मिटवु या, सन्मानाने स्विकार करू याचा सर्वत्र जागर होणार आहे. महात्मा गांधी यांची पुण्यतिथी ३० जानेवारी कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा करण्यात आला. या पंधरवाड्यात नुक्कड नाटिकाव्दारे जनजागृती करणे तसेच जिल्ह्यातील रोगमुक्त झालेल्याचे मनोगत, खाजगी वैद्यकीय व्यवसायीकांची कार्यशाळा, शाळेमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोगाबाबत प्रतिज्ञाचे वाचन करणे, शाळेतील सुचना फलकावर कुष्ठरोगाबाबतचे संदेश लिहिणे, प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, रांगोळी स्पर्धा व पथनाट्य, कुष्ठरोगावरील म्हणी/घोषवाक्य शालेय विद्यार्थी प्रभातफेरी तसेच कुष्ठरोग दौड मॅराथानचे आयोजन इत्यादी विविध कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कुष्ठरुग्णाबाबत समाजात भेदभाव न होता सन्मानाने जगण्यासाठी समाजातीज सर्व घटकांनी प्रयत्न करावे व प्रत्येक कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. सामाजिक कारणाने कुष्ठरोग लपविण्याकडे लोकांचा विशेषत: महिला–भगीनींचा कल असतो. आरोग्य विभागाने सोशल मिडीया, सामाजिक संस्था व इतर माध्यमांव्दारे लोकांचे प्रबोधन करुन योग्य उपचाराने हा आजार बरा होतो असा विश्वास देऊन जास्तीत जास्त संशयीत रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. सन २०२७ पर्यत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसाराचे ध्येय गाठण्यासाठी आरोग्य प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.


## ग्राम पंचायत कार्यालय धानोरी
### पंचायत समिती सडक अर्जुनी जि.गोंदिया
### -: निविदा सुचना:-

जा.क्र.ग्रा.पं.धानोरी/नि.८/२०२३–२४ दिनांक :–०९/०१/२०२४

ग्रा.पं.धानोरी त.स.अर्जुनी जि.गोंदिया च्यावतीने खालील नमुद केलेल्या कामाकरिता ऑफलाईन जाहीरात पद्धतीने महाराष्ट्र शासन जि.प.गोंदिया सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेबाबत संपूर्ण माहिती ग्रामपंचायत धानोरी येथे दिनांक:–०७/०२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून दिनांक:– ११/०२/२०२४ ला दुपारी ३.०० वाजता पर्यंत पाहता येईल व निविदा मिळतील आणि भरता येईल.

| कामाचे नाव | कामाची किंमत | निविदा फी | अनामत रक्कम १% | निधी प्रमुख | कामाचा कालावधी | कंत्राटदाराचे प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १.घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे. | ३,८४,१३८/– | ५००/– | ३,८५०/– | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत जि.प.गोंदिया | १८० दिवस | १ ते ७ |
| २.शौचालय बांधकाम करणे | १,००,०००/– | ५००/– | १,०००/– | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| ३.वामन पारधी ते माधोराव रामटेके यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे | १,५०,०००/– | ५००/– | १,५००/– | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| ४.गजानन पारधी ते दादुजी रहांगडाले यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे | २,०४,०८१/– | ५००/– | २,१००/– | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |

**निविदा बाबद आवश्यक बाबी:–** १. निविदा विक्री व स्विकृती ०७/०२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून दिनांक:–११/०२/२०२४ ला दुपारी ३.०० वाजता पर्यंत २. निविदा उघडणे १२/०२/२०२४ दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) ३. निविदा फी ही निविदा खरेदी करतांना नमुना ७ च्या पावती द्वारे भरण्यात यावी. ४. सुरक्षा अनामत रक्कम ही निविदा उघडल्यानंतर ५ दिवसाच्या आत नमुना ७ च्या पावती द्वारे ग्रा.पं.कार्यालय धानोरी येथे जमा करुन पावती क्र.नोंदणी करुन पावतीची प्रत कार्यालयात जमा करावी.५. कोणतीही निविदा अंशत: अथवा पुर्णत स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सरपंच व ग्रामसेवक ग्रा.पं.धानोरी यांनी राखून ठेवण्यात आलेली आहे.

**सरपंच**
ग्रा.पं.धानोरी

**सचिव**
ग्रा.पं.धानोरी



## कार्यालय ग्राम पंचायत सोनबिहरी पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया
### निविदा सुचना

ग्राम पंचायत सोनबिहरी अंतर्गत १५ वित्त आयोग फंड सण २०२०–२०२१ ते २०२३–२०२४ व इतर निधी सण २०२३–२४ वर्षा करीता पाणी पुरवठा योजनेचे साहित्य हातपंपास लागणारे साहित्य स्ट्रीट लाईट दिवाबत्ती करिता लागणारे साहित्य तसेच विद्युत फिटींग करीता लागणारे साहित्य संगणक करीता लागणारे साहित्य कार्यालयीन लागणारे फर्निचर साहित्य पुरविण्याकरिता निविदा (दरपत्रक) पंजीकृत पुरवठाधारकाकडून मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक पुरवठाधारकांनी दि.१३/०२/२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावे. प्राप्त दरपत्रक शक्य झाल्यास दि.१३/०२/२०२४ ला दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येईल.

**साहित्याचे विवरण.** १) हातपंपास लागणारे साहित्य, पाईप १ इंच/रॉड/चैन बेअरींग/सिलेंडर/वायसर/साकेट/एक्सल पीन/अप्परवाल/लोवरवाल/नटबोल्ट व ईतर हातपंपास लागणारे साहित्य. २) पाणी पुरवठा योजनेस लागणारे साहित्य/पीव्हीसी पाईप अर्धा इंच १ इंच/२ इंच.३ इंच एचडीपीई पाईप/पीव्हीसी साकेट/पीव्हीसी केपलर/७५एमएम/९० एमएम ११० एमएम/पीव्हीसी टी.पीव्हीसी वॉल,पीव्हीसी. निप्पल/पीव्हीसी.युनियन/पीव्हीसी एच ६०,नल व इतर आवश्यक साहित्य.३)दिवाबत्ती साहित्य स्ट्रीट लाईट करीता लागणारे साहित्य–एलईडी बल्ब १५ वाट/१८ वाट/२० वाट/२३ वाट/२५ वाट/३० वाट/होल्डर वायर कॉपर/एल्युमिनियम/ग्रीप एलसीबी व ईतर आवश्यक साहित्य. ४) विद्युत फिटींग करीता लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य.५) संगणकाला लागणारे सर्व प्रकारचे साहित्य–कम्प्युटर कंपलिट सेट/लॅपटॉप/प्रिंटर ऑल ईन वन व ईतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ६) कार्यालय लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य–लोखंडी आलमारी, टेबल, व्हीलचेयर व इतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य.७) अपंग/विधवा महिलांकरिता लागणारे सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य–मच्छरदानी व इतर सर्वप्रकारची आवश्यक साहित्य. ८) सार्वजनिक स्थळी करीता सर्व प्रकारची लागणारे साहित्य–थ्रीरीसीटर लोखंडी बेंच व इतर सर्व प्रकारचे साहित्य.९) अंगणवाडी/शाळा करीता लागणारे सर्व प्रकारचे साहित्य–खेडणी साहित्य व इतर सव प्रकारचे साहित्य. १०) उपकेंद्र करीता लागणारे साहित्य–बेड कार्यालयीन सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य.११) पाणी सुद्धी करण करण्याकरिता बिलचींग पावडर व इतर.
अटी व शर्ती :–१) अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच कार्यालयात पहावयास मिळेल.

**सरपंच**
**ग्राम पंचायत सोनबिहरी**
पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत सोनबिहरी**
पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया



## कार्यालय ग्राम पंचायत बलमाटोला पं.स.गोंदिया जि.प.गोंदिया
### निविदा सुचना

ग्राम पंचायत बलमाटोला अंतर्गत १५ वित्त आयोग फंड सण २०२०–२०२१ ते २०२३–२०२४ व इतर निधी सण २०२३–२४ वर्षा करीता पाणी पुरवठा योजनेचे साहित्य हातपंपास लागणारे साहित्य स्ट्रीट लाईट दिवाबत्ती करिता लागणारे साहित्य तसेच विद्युत फिटींग करीता लागणारे साहित्य संगणक करीता लागणारे साहित्य कार्यालयीन लागणारे फर्निचर साहित्य पुरविण्याकरिता निविदा (दरपत्रक) पंजीकृत पुरवठाधारकाकडून मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक पुरवठाधारकांनी दि.१३/०२/२०२४ दुपारी १.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावे. प्राप्त दरपत्रक शक्य झाल्यास दि.१३/०२/२०२४ ला दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येईल.

**साहित्याचे विवरण.** १) हातपंपास लागणारे साहित्य, पाईप १ इंच/रॉड/चैन बेअरींग/सिलेंडर/वायसर/साकेट/एक्सल पीन/अप्परवाल/लोवरवाल/नटबोल्ट व ईतर हातपंपास लागणारे साहित्य. २) पाणी पुरवठा योजनेस लागणारे साहित्य/पीव्हीसी पाईप अर्धा इंच १ इंच/२ इंच.३ इंच एचडीपीई पाईप/पीव्हीसी साकेट/पीव्हीसी केपलर/७५एमएम/९० एमएम ११० एमएम/पीव्हीसी टी.पीव्हीसी वॉल,पीव्हीसी. निप्पल/पीव्हीसी.युनियन/पीव्हीसी एच ६०,नल व इतर आवश्यक साहित्य.३)दिवाबत्ती साहित्य स्ट्रीट लाईट करीता लागणारे साहित्य–एलईडी बल्ब १५ वाट/१८ वाट/२० वाट/२३ वाट/२५ वाट/३० वाट/ होल्डर वायर कीपर/एल्युमिनियम/ग्रीप एलसीबी व ईतर आवश्यक साहित्य. ४) विद्युत फिटींग करीता लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य.५) संगणकाला लागणारे सर्व प्रकारचे साहित्य–कम्प्युटर कंपलिट सेट/लॅपटॉप/प्रिंटर ऑल ईन वन व ईतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य. ६) कार्यालय लागणारे सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य–लोखंडी आलमारी, टेबल, व्हीलचेयर व इतर सर्व प्रकारचे आवश्यक साहित्य.७) अपंग/विधवा महिलांकरिता लागणारे सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य–मच्छरदानी व इतर सर्वप्रकारची आवश्यक साहित्य. ८) सार्वजनिक स्थळी करीता सर्व प्रकारची लागणारे साहित्य–थ्रीरीसीटर लोखंडी बेंच व इतर सर्व प्रकारचे साहित्य.९) अंगणवाडी/शाळा करीता लागणारे सर्व प्रकारचे साहित्य–खेडणी साहित्य व इतर सव प्रकारचे साहित्य. १०) उपकेंद्र करीता लागणारे साहित्य–बेड कार्यालयीन सर्वप्रकारचे आवश्यक साहित्य.११) पाणी सुद्धी करण करण्याकरिता बिलचींग पावडर व इतर.
अटी व शर्ती :–१) अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच कार्यालयात पहावयास मिळेल.

**सरपंच**
**श्री.रूवेन्द्र टी.पाचे**
ग्रामपंचायत, बलमाटोला

**ग्रामसेवक**
**श्री.मोहपत नागपुरे**
ग्रामपंचायत, बलमाटोला

# बफर झोनमध्ये "धांगडधिंगा"

## भागा क्षेत्रात हॉलिडे होममुळे व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांना धोका



गोंदिया:–नागझिरा–नवेगाव अभयारण्याच्या बफर आणि गाभा क्षेत्रात ३४७ गावे संवेदनशील म्हणून राजपत्रात जाहीर करण्यात आली आहे. आता नवीन वाघिणीदेखील व्याघ्र प्रकल्पात आल्या. मात्र या गाभा आणि बफर क्षेत्रात काही खासगी व्यक्तींना हॉलिडे होम तयार केल्याने पर्यटक थांबतात. जोरात ओरडतात तर काही गाणी वाजवितात. यामुळे वन्यजीवांना धोका निर्माण झाला आहे. सततच्या या प्रकारामुळे आता वन्यजीव बफर क्षेत्रातून बाहेर पडू लागले आहे.

गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील नवेगावबांध अभयारण्य व्याघ्र प्रकल्प म्हणून २०१३ पासून अस्तित्वात आला. अभयारण्यातील ३४७ गावे संवेदनशील असल्याचे २५ फेब्रुवारी २०१६ च्या राजपत्रात नमूद करण्यात आले. ताडोबा अभयारण्यातील वाघिणी येथे सोडण्यात आल्या. त्यामुळे वाघांची संख्या वाढल्याने पर्यटकांची पावलेही व्याघ्र प्रकल्पाकडे वळू लागली आहे. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत पर्यटकांनी व्याघ्र प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भेट दिल्याने शासनाला महसूलदेखील मोठ्या प्रमाणात मिळाला. मात्र, जानेवारी महिन्यात वनविभागाने महाडोर, रानमोडी, वन्पती काढल्याचे काम सुरु केल्याने वन्यप्राणी विचचित होऊन गाभा क्षेत्रातून बाहेर पळून गेले. त्यामुळे पर्यटकांचा डिरमोड झाल्याने जानेवारी महिन्यात नागझिराकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते. उल्लेखनीय म्हणजे व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात एफडीसीएम चालवित असलेल्या तलाकुंज, मधुकुंज, हॉलिडे होम येथे मुंबई–पुणे आणि इतर मोठ्या शहरांतील पर्यटक थांबतात. उपहारगृह, हॉलिडे होम असा हा प्रवास रात्रभर सुरु असतो. त्यामुळे गाभा क्षेत्रात पाणी पिण्यास येणाऱ्या वन्यजीवांना त्याचा त्रास होत आहे. परिणामी वन्यजीव आता गाभा क्षेत्र सोडून बाहेर पडल्याने शिकारीचे प्रमाणही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी गाभा क्षेत्रातील हॉलिडे होम बंद करण्याची गरज आहे.

**विभागीय आयुक्त, नागपूर, आमदार नाना पटोले,आमदार विजय रहांगडाले, जिल्हाधिकारी गोंदिया, जिल्हाधिकारी भंडारा, उपवनसंरक्षक वनविभाग, गोंदिया,उपवनसंरक्षक वनविभाग, भंडारा, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग देवरी, उपमहा प्रबंधक महाराष्ट्र राज्य, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर, उपविभागीय अधिकारी साकोली, मुकुंद धुर्वे मानद वन्यजीव रक्षक गोंदिया जिल्हा, सावन बहेकार, मानव वन्यजीव रक्षक गोंदिया जिल्हा, नदीम खान मानद वन्यजीव रक्षक भंडारा, शाहीद खान मानद वन्यजीव रक्षक भंडारा जिल्हा,अनिल देशमुख मानद वन्यजीव रक्षक भंडारा जिल्हा, अनिल किरणापुरे पं.स.सदस्य साकोली, शालीदार कापगते पं.स.सदस्य सडक अर्जुनी, वसंत कहाळकर रा.बाम्हणी जि.भंडारा, मंजुषा धनुष वाढई सुकन्या संकल्प निकेतन हायस्कूल काटी ता.गोंदिया, डॉ.श्रीराम भुस्कुटे, रुपेश मुरलीधर निंबार्ते, सुनिल धोटे, डॉ. राजेंद्र जैन, राजेश कनोजिया यांचा समावेश आहे.**

### सभेकडे लागल्या नजरा

**नागझिरा–नवेगव स्थानिक सल्लागार समितीची सभा ७ फेब्रुवारीला आयोजित केली आहे. ही सभा विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात होणार आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्याची गरज आहे. अन्यथा मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीवांनी गाभा क्षेत्र सोडल्यास पुन्हा पर्यटकांचा हिरमोड होण्याची नाकारता येत नाही.**

### दिल्लीतील चमूचा आक्षेप

**गाभा क्षेत्रातील हस्तक्षेपाबाबत जनप्रतिनिधी आणि वन्यजीवप्रेमींनी तक्रार नोंदविली होती. गाभा क्षेत्रातील हस्तक्षेप बंद करण्याचा व्याघ्र प्रकल्पाच्या मॅन्युअलमध्येही उल्लेख आहे. दिल्लीवरुन आलेल्या वनविभागाच्या चमूनेही आक्षेप नोंदविला होता. असे असतानाही यावर कारवाई होत नाही. माजी सभापती अशोक लंजे यांनी इन्स्पेक्टर जनरल (वन), वन व पर्यावरण खाते भारत सरकार, अतिरिक्त इन्स्पेक्टर जनरल (वन्यजीव) यांच्याकडेही पाठपुरावा केला. परंतु त्यावर अद्याप उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प यांनी कारवाई केलेली नाही.**

# स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून गाव स्वच्छतेचा संकल्प करा-विभागीय आयुक्त बिदरी

- संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान पुरस्काराचे वितरण
- गोंदिया जिल्ह्यातील देवलगाव व नवेझरी ग्रामपंचायती विभागात तृतीय पुरस्काराने पुरस्कृत



**गोंदिया:–** स्वच्छतेमुळे आरोग्यमान उंचावते हा मुळ मंत्र घेऊन संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून विभागातील प्रत्येक गाव स्वयंपूर्ण करण्यासोबत स्वच्छ करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त विजलक्ष्मी बिदरी यांनी केले.

यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारातर्गंत राज्य व विभागीय स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या पंचायत समितींना पुरस्कार देऊन विभागीय आयुक्तांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. वनामती येथील सभागृहात नागपूर विभागातील राज्य व विभागात उत्कृष्ट ठरलेल्या ग्रामपंचायतींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील दोन ग्रामपंचायती देवलगाव व नवेझरी यांना प्रशस्तीपत्र व धनादेश देऊन गौरविण्यात आले.

यावेळी वनामतीच्या संचालक डॉ. मिताली सेठी, विकास उपायुक्त कमलकिशोर फुटाणे, उपायुक्त विवेक इलमे, भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. एम. कुर्तकोटी, विस्तार अधिकारी छत्रपाल पटले यांची उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या मुलभूत गरजांची पुतर्ता करतांना स्वच्छ पिण्याचे पाणी आरोग्याच्या सुविधा पुरवितांना पंचायत राज अभियान व संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानाच्या माध्यमामध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले.

नागपूर विभागातील राज्य व विभागीय स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या काटोल पंचायत समितीला एकुण २८ लक्ष रुपयाचा तर राज्यस्तरीय व विभागात उत्कृष्ट ठरलेल्या भंडारा पंचायत समिती एकुण २६ लक्ष रुपयाचे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यशवंत पंचायत राज अभियान (२०२०–२१) व्दितीय पुरस्कार पं.स. पोभुर्णा चंद्रपूर, तर तृतीय पुरस्कार पं.स कामठी नागपूर यांना देण्यात आला. सन २०२०–२१ चा राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार पंचायत समिती भंडारा यांना देण्यात आला. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान (२०२१–२१) विभागस्तराव प्रथम पुरस्कार ग्रामपंचायत खैरी (वलमाझरी) पं.स साकोली, व्दितीय पुरस्कार ग्रामपंचायत खापरी (केणे) पंचायत समिती नरखेड, तृतीय पुरस्कार संयुक्तपणे ग्रामपंचायत दिभना, पंचायत समिती गडचिरोली, ग्रापंचायत नवेझरी पंचायत समिती तिरोडा. स्व.वंसतराव नाईक सांडपाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार ग्रामपंचायत कोटंबा पंचायत समिती सेलू तर स्व.बाबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कार ग्रामपंचायत बेलगाव पंचायत समिती कुरखेडा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार ग्रामपंचायत मंगी (बु) पंचायत समिती राजुरा यांना देण्यात आला.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान (२०१९–२०) अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेमध्ये विभागस्तरीय प्रथम पुरस्कार ग्रामपंचायत येणिकोनी पंचायत समिती नरखेड, व्दितीय पुरस्कार ग्रामपंचायत सीतेपार पंचायत समिती मोहाडी, तृतीय पुरस्कार संयुक्तपणे ग्रामपंचायत देवलगाव पंचायत समिती अर्जुनी (मोर), ग्रामपंचायत कोसंगी पंचायत समिती मूल.

स्व.वसंतराव नाईक सांडपाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार ग्रामपंचायत अरततोंडी पंचायत समिती कुरखेडा, स्व.बाबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन विशेष पुरस्कार ग्रामपंचायत खुर्सापार पंचायत समिती काटोल, डॉ.बाबसाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार ग्रामपंचायत बाजरवाडा पंचायत समिती आर्वी यांना देण्यात आला.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगाव तसेच तिरोडा तालुक्यातील नवेझरी ग्रामपंचायतींचा पुरस्कार स्वीकारण्यासाठी जिल्हा परिषद गोंदियाच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर, अर्जुनी मोरगा–वचे गटविकास अधिकारी विलास निमजे, उपसभापती होमराज पुस्तोडे, जिल्हा समन्वयक भागचंद रहांगडाले, विस्तार अधिकारी राणे, सरपंच दिपाली कापगते, उपसरपंच तामदेव कापगते, ग्रामपंचायत सदस्य कालिदास पुस्तोडे, ग्रामसेवक धर्मराज लंजे, तिरोडाचे गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, माजी सरपंच महेंद्र भांडारकर, विस्तार अधिकारी व प्रशासक नेताजी धारगावे, ग्रामसेवक पंजाबराव चव्हाण, गट समन्वयक संजय राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त कमलकिशोर फुटाणे यांनी केले तर संचालन दिनेश मासोदकर, आभार उपायुक्त विवेक इलमे यांनी मानले.

# थकबाकी मिळवून देण्याच्या नावे गोळा केले जातायेत सरासरी १० हजार रुपये

## थकबाकी मिळवून देण्याच्या नावे होणार २–३ कोटी निधीची वसुली



**गोंदिया:** जिल्ह्यात शिक्षकांना वेतनातील थकबाकीची रक्कम देण्याकरीता शासनाकडून कोट्यावधी रुपयाचा निधी शिक्षण विभागाकडे आला आहे.त्याचप्रमाणे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्याही थकबाकीचा निधी वित्त विभागात पोचला आहे.तो थकबाकीचा निधी संबधित कर्मचाऱ्यांच्याला लाखोमध्ये मिळणार आहे.विशेष म्हणजे तो त्यांच्या हक्काचा निधी असतानाही तो निधी त्यांच्या खात्यावर वळते करण्याकरीता सरासरी १० हजार रुपयाची मागणी करण्यात आली आहे.याम ाध्यमातून लाखोचा घोटाळा जिल्हा परिषदेतंर्गत शिक्षण विभागासह विविध विभागात होऊ घातल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अशा घटनांची दखल स्वतःघेणे गरजेचे झाले आहे.

विशेष म्हणजे शिक्षक संवर्गात तर हा १० हजार रुपयाचा निधी गोळा करण्याकरीता काही संघटनाच्या नेत्यामध्येच जणू स्पर्धा लागली की काय असे दिसून येत आहे.तशीच अवस्था शिक्षकेत्तर कर्मचारीगटात आहे.एकीकडे हक्काचा निधी मागण्याकरीता शिक्षकांनी टक्केवारी देऊन तो पैसा मिळविणे याचा अर्थ एक तर तो चुकीच्या पध्दतीने शासनावर दबाव टाकून तर निधी मिळविला नाही ना अशी शंका निर्माण होऊ लागली आहे.

६ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयानुसार गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांना नक्षल भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता मिळणे हा शिक्षकांचा हक्क होता.परंतु खूप वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित होता.त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच संघटनानी हा विषय जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आणून दिला.त्यामुळे सर्व शिक्षकांना नक्षल भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता सरसकट थकबाकी सह देण्याबाबतचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकार्यांनी काढले.त्यानुसार शासनाला निधीची सुद्धा मागणी प्रशासनाने केली.आणि निधी संचालक पुणे यांच्याकडून निधी प्राप्त होणार आहे हे लक्षात येताच काही संघटनेच्या लोकांनी शिक्षकांच्या बैठका घेऊन आम्ही निधी आणत आहोत असे सांगून शिक्षकांकडून थकबाकीच्या ६ ते १० टक्के एवढी रक्कम गोळा करण्यास सुरवात केल्याचेच नव्हे तर काही ठिकाणी गोळा झाल्याची चर्चा शिक्षक वर्गातूनच बाहेर पडली.

विशेष म्हणजे या टक्केवारीच्या वसुलीकरीता संघटनेचे पदाधिकारीच पुढाकार घेत असल्याच्या चर्चामुळे आत्ता शिक्षकही टक्केवारी वसुलीच्या कामात लागल्याची चर्चा कानावर हमखास ऐकावयास मिळत आहे.मिळालेल्या माहितीच्या आधारे १० हजार प्रमाणे ३ हजार शिक्षकांकडून जवळपास अडीच ते तीन कोटी रुपये गोळा करण्यात आल्याचे वृत्त असून हा कोटीचा निधी कुठल्या अधिकारी वर्गाला जाणार आहे.पैशाची मागणी करणारा तो इमानदार अधिकारी कोन अशाही चर्चा सुरु असून जो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी टक्केवारीची रक्कम देणार नाही,त्याची रक्कम देण्यास विविध कारणे सुध्दा दाखवण्याची तयारी सुरु झाल्याची कुजबूज असल्याने कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही अशी धारणा शिक्षकांची झाली आहे.या प्रकरणात एकाही शिक्षक संघटनेने वसुली विरोधात न उचललेला आवाज संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

# ब्राह्मणांसाठी आर्थिक विकास महामंडळ ;ओबीसी बहुजन कल्याण विभागाचे परिपत्रक

**गोंदिया–** ब्राह्मण सामाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील तरुणांना व्यावसायिक मदतीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन्याचा प्रस्ताव आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १४ डिसेंबर २०२३ रोजी नागपुरात बैठक झाली होती. यात समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा झाली. या समितीची प्रमुख मागणी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची होती.

या बैठकीत आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भातील परिपत्रक इतर मागास बहुजन कल्याण विभागाने प्रसिद्ध केले आहे. ओबीसींच्या विद्यार्थ्यांना धड काही मिळाले नाही आणि आता ओबीसी मंत्रालयातून ब्राह्मण धर्मातील विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले आहे.

# आदिवासी गोंडगोवारी समाजाने काढला नागपूरात भव्य मोर्चा



**गोंदिया :–**आदिवासी गोंड गोवारी समाजाचा प्रलंबित मागण्या व समस्यांना घेऊन आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समितीच्या वतीने संविधान चौक, नागपूर येथे २६ जानेवारीपासून आमरण उपोषण केले जात आहे. परंतु, या उपोषणाकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. आमरण उपो–षणावर असलेल्यांची प्रकृती खालावत चालली असून शासन दखल घेताना दिसून येत नाही. शासनाच्या या कृती विरोधात आदिवासी गोंडगोवारी समाजामध्ये असंतोष निर्माण झाला आहे. याविरोधात नागपूर येथे समाज बांधव आपले अधिकार व हक्कासाठी ५ फेब्रुवारी रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला.या आंदोलनात आदिवासी गोंड गोव–ारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समितीचे कार्यकारी संयोजक रामदास नेवारे, आदिवासी गोंडगोवारी समाज संघटनेचे गोंदिया अध्यक्ष सुशिल राऊत यांनी नेतृत्व केले.

त्या पार्शवभूमीवर समाजाच्या मागण्या शासन दरबारी प्रखर पणे मांडण्यात यावी जेणे करून समाजाला न्याय मागता येईल या करिता रविवार ४ फेबुवारी ला आमदार विनोद अग्रवाल यांना निवेदन देण्यात आले होते. गोंडगोवारी समाजाच्या प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांकडे शासन सतत दुर्लक्ष करीत आहे. मागील कित्येक वर्षांपासून अधिकार व हक्कासाठी गोंड गोवारींचा लढा सुरू आहे. पण राज्यकर्ते संवैधानिक मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहेत. या विरोधात आदिवासी गोंड गोवारी जमात संविधानिक हक्क संघर्ष कृती समिती, महाराष्ट्राच्या नेतृत्वात संविधान चौक, नागपूर येथे २६ जानेवारीपासून आमरण उपो–षणाला सुरूवात करण्यात आली आहे.

शासन मागण्यांना घेऊन गंभीर नसून फक्त आश्वासन देऊन समाजाची दिशाभूल केली जात आहे. खुद्द मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपोषण मंडपात भेट देत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहिल, असा इशारा देण्यात आला आहे. परंतु, दखल घेण्याऐवजी या उपोषणाकडे शासनाने दुर्लक्ष केले असून उपोषणावर असलेले किशोर चौधरी, सचिन चचाने व चंदन कोहरे यांची प्रकृती खा–लावली आहे. यामुळे शासन गोंडगोवारीचा सुड घेत आहे, अशी भावना समाजात निर्माण झाली असून शासन कृती विरो–धात असंतोष व्यक्त केला जात आहे.

# प्रजीत नायर यांनी स्वीकारला जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार

**गोंदिया:** जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी म्हणून प्रजीत नायर यांनी मावळते जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्याकडून आज कार्यभार स्वीकारला. चिन्मय गोतमारे यांची वैधानिक विकास महामंडळाच्या सचिव पदावर बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर सिंधुदुर्ग येथून प्रजीत नायर हे जिल्हाधिकारी म्हणून आले. त्यांनी आज कार्यभार स्वीकारला.

श्री. प्रजीत नायर हे यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्हा परिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते २०१७ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांचे शिक्षण अभियांत्रिकी पदवी व एम.ए. पर्यंत झाले आहे. त्यांची मातृभाषा मल्याळम असून ते उत्तम मराठी बोलतात. परीविक्षाधीन अधिकारी जिल्हा प्रशिक्षण सिंधुदुर्ग जिल्हा, परीविक्षाधीन अधिकारी जिल्हा प्रशिक्षण अहमदनगर, प्रभाग अधिकारी महानगरपालिका अहमदनगर, परीविक्षाधीन जिल्हाधिकारी– निवडणुक निर्णय अधिकारी अहमदनगर, सहाय्यक सचिव औषध निर्माण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार जिल्हा पालघर आदी ठिकाणी त्यांनी कार्य केले आहे. २६ फेबुवारी २०२१ ते २ फेबुवारी २०२४ या कालावधीत ते मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग या पदावर कार्यरत होते. आता त्यांनी जिल्हाधिकारी गोंदिया या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.



यावेळी अपर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर, सहायक जिल्हाधिकारी तथा देवरी उपविभागीय अधिकारी सत्यम गांधी, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) चंद्रभान खंडाईत, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) भैय्यासाहेब बेहरे, जिल्हा पुरवठा अधिकारी देवराव वानखेडे व जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# राज्यात शिक्षकांची २१ हजार ६७८ पदे भरली जाणार

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या सभागृहातील पाठपुराव्याला यश



**गोंदिया :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात २५ जुलै २०२३ रोजी तारांकित प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी १५ ऑगस्ट २०२३ पासून राज्यात पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया सुरू होईल असे सभागृहात सांगितले. मात्र, प्रत्यक्षात शिक्षक भरती प्रक्रियेला सुरवात झालेली नाही. याबाबत आमदार अडबाले सतत सभागृहात पाठपुरावा करीत होते. अखेर शिक्षक भरतीसंदर्भात पवित्र पोर्टलवर ५ फेब्रुवारी २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध झाल्याने आमदार सुधाकर अडबाले यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

राज्यात शालेय शिक्षण विभागातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पदे शासन भरत नसल्याने रिक्त जागांचा आकडा दरवषी वाढत असतो, काही जागा समायोजन प्रकियेने भरण्यात येत असल्या तरी रिक्त जागांचा अनुशेष भरून निघत नसल्याने याचा विपरित परिणाम या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होत आहे.

याबाबत आमदार अडबाले यांनी पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये शिक्षक भरती करण्याबाबत तारांकीत प्रश्न उपस्थित केला. यावर शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी १५ ऑगस्ट ते २४ ऑक्टोंबर २०२३ दरम्यान राज्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांपैकी ३० हजार पदे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे उत्तर दिले होते. परंतु, १५ ऑगस्ट लोटूनही राज्याच्या शिक्षण विभागाला शिक्षक भरतीची प्रक्रिया कार्यवाही करण्यात अपयश आले.

राज्य शासनाने तातडीने शिक्षक भरतीची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी सातत्याने आमदार सुधाकर अडबाले सभागृहात व शिक्षण विभागाकडे करीत होते. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले. शिक्षक भरतीसंदर्भात पवित्र पोर्टलवर ५ फेब्रुवारी रोजी जाहिरात प्रसिद्ध झाली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी शिक्षण संस्थांच्या शाळांमधील २१ हजार ६७८ रिक्त जागांवर शिक्षकांची पदे भरली जाणार आहेत. गेल्या एक वर्षांपासून प्रतिक्षेत असणाऱ्या टीईटी धारकांमध्ये आनंदाचे वाता–वरण निर्माण झाले आहे.

नागपूर विभागातील नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक विभागात ५०१, चंद्रपूर ३०७, भंडारा २८२, गोंदिया ४, गडचिरोली ११ तर वर्धा २२८ रिक्त पदे भरली जाणार आहे. आमदार सुधाकर अडबाले यांनी सतत केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# ओबीसी जनगणना यात्रेला प्रारंभ




**नागपूर:** ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्यासंदर्भात सात जिल्ह्यांतून ओबीसी जनगणना यात्रेचा वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथून ३ फेब्रुवारी रोजी प्रारंभ झाला.

रविवारी यात्रेचे नागपूरात आगमन झाले. यावेळी यात्रेचे प्रमुख उमेश कोर्राम, अनिल डहाके व सहकाऱ्यांनी दीक्षाभुमी येथे महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन केले व बहुजन समाजाच्या हितासाठी ओबीसींची जनगणना सरकारने तात्काळ करावी, अशी मागणी केली. दीक्षाभुमी येथून संविधान चौकापर्यंत यात्रा काढण्यात आली.

यानंतर पुढे नागपूर भंडारामार्गे यात्रा पुढे गेली. ओबीसी राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालय खटला, रोहिणी आयोग, भारत सरकार व नीती आयोग नेहमी ओबीसी जनमानसात जनजागरणाचा हेतू बिहार राज्याने यशस्वीपणे जातीनिहाय जनगणना केली आहे. सोबतच आंधप्रदेशातसुद्धा १९ जानेवारीपासून जातीनिहाय जनगणनेला सुरुवात झाली आहे. तेव्हा राज्यातही जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे. यासाठी जनजागरण व महाराष्ट्र शासनाला अवगत कण्याच्या उद्देशाने ओबीसी यात्रा आहे असे कोर्राम यांनी सांगितले.

१९३१ पासून आतापर्यंत ओबीसींची जातीनिहाय जनगणना न झाल्यामुळे भारत सरकारकडे डेटा उपलब्ध नाही. त्यामुळे अनेक वेळा न्ययालयात अथवा धोरण ठरवताना शासनाला अनेक अडचणी येतात. यामुळे मंडल आयोगाने ठरवलेल्या ५२ ओबीसी समुदायावर अन्याय होत असल्याचा आरोप कोर्राम यांनी केला.

# ओबीसी जनगणना संकल्प यात्रा सुरु

**वर्धा:** ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसाठी जनगणना संकल्प यांत्रा सेवाग्राम येथून शनिवारी प्रारंभ झाली. उमेश कोर्राम यांच्या नेतृत्वात ओबीसी युवा अधिकार मंच आणि संघर्ष वाहिनीच्या पुढाकाराने ही यात्रा काढण्यात आली आहे.

विदर्भातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, गोंदिया, भंडारा अशा सात जिल्ह्यांतून ही यात्रा जाणार आहे. दहा दिवस एक हजार किलोमीटरचा प्रवास करीत गावागावात कॉर्नर सभा घेऊन ओबीसींना जागृत केले जाणार आहे.



बिहार आणि आंधप्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे यासाठी ओबीसी समाज तसेच शसनाला अवगत करण्याच्या उद्देशाने ही यात्रा गावागावात पोहचत आहे.